## दिन विशेष...

१८८२ : 'मराठी भाषेचे शिवाजी' ही पदवी मिळवणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा स्मृतिदिन.
१९२७ : बांगला देशाचे संस्थापक पंतप्रधान व राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबर रहमान यांचा जन्मदिन.
१९४४ : भारतीय नौदल अभियांत्रिकी संस्था आय.एन.एस.शिवाजीची लोणावळा येथे स्थापना झाली.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७५,५०२.८५ +९३८.९३ (१.२६%)
डॉलर ₹ ९२.२२

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | २० |
| दिल्ली | ३० | १७ |
| मुंबई | ३३ | २३ |
| नागपूर | ३७ | २१ |
| पुणे | ३५ | १५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार , दि. १७ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२५ किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

आपल्या आयुष्याची कहाणी आपणच लिहितो. प्रत्येक प्रसंग हा एक नवीन अध्याय आहे, जो आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी आपल्याला प्रेरित करतो.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३५ संध्या-६:३८

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६०,१९५/- २,७०,०००/-

## थोडक्यात

### नवीन टॅरिफ रचना लागू होईपर्यंत भारत-अमेरिका व्यापार कराराला ब्रेक

**नवी दिल्ली ।** भारत-अमेरिका व्यापार करारावर स्वाक्षरी नवीन टॅरिफ फ्रेमवर्क लागू झाल्यानंतरच होईल, असे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सोमवारी व्यापार आकडेवारीविषयीच्या ब्रीफिंगदरम्यान सांगितले. अग्रवाल यांच्या मते, न्यायालयाच्या निर्णयानंतर अमेरिकेने जागतिक टॅरिफ दर पुन्हा लागू केल्यानंतरच हा करार अंतिम करण्यात येईल.

गेल्या महिन्यात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने लादलेला 'रेसिप्रोकल टॅरिफ' रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता.

### बीडमध्ये खासगी बस उलटून भीषण आग!

**बीड ।** जिल्ह्यात एका खाजगी प्रवासी बसचा टायर फुटून बस उलटली आणि काही वेळातच बसला आग लागल्याने या घटनेत २० प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना पहाटे अडीच वाजता कैज तालुक्यात मांजर्सुंबा-अंबाजोगाई रस्त्यावरील सुरानी गावाजवळ घडली आहे. या जखमींमध्ये एका ३ महिन्यांच्या बाळाचाही समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, २८ प्रवासी घेऊन जाणारी ही बस जळगावहून लातूरच्या दिशेने निघाली होती. एका तीव्र वळणावर बसचा टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.

### मोजतबा खामेनी यांच्यावर रशियात गुप्तपणे उपचार?

**तेहरान ।** अमेरिका-इस्रायलने २८ फेब्रुवारी रोजी केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे तत्कालीन सर्वोच्च नेते आयतुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचा मुलगा मोजतबा खामेनी यांची सर्वोच्च नेतेपदी नियुक्ती करण्यात आली. तेव्हापासून मोजतबा खामेनी हे कुठे आहेत? त्यांच्याबाबत जागतिक स्तरावर मोठे संभ्रम होता. डोनाल्ड ट्रम्प यांनी मोजतबा खामेनी 'जिवंत नसावेत' असा संशय व्यक्त केला.

## 'मालमत्ता गोठवा, अमेरिका प्रवेशावर बंदी घाला

# आरएसएस, 'रॉ'वर निर्बंध लावा

## अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाची ट्रम्प प्रशासनाकडे शिफारस

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**युनाइटेड स्टेट्स कमिशन ऑन इंटरनेशनल रिलीजियस फ्रीडमने भारतातील धार्मिक स्वातंत्र्याच्या उल्लंघन प्रकरणी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आणि भारताची गुप्तचर संस्था 'रिसर्च अँड अनालिसिस विंग' (R&AW) या संघटनांवर निर्बंध लादण्याची शिफारस केली आहे.**






**या आयोगाने अशीही शिफारस केली आहे की ट्रम्प प्रशासनाने भविष्यात अमेरिकेकडून भारताला दिली जाणारी मदत आणि द्विपक्षीय व्यापार धोरणे ही धार्मिक स्वातंत्र्यासंबधी सुधारणांशी जोडलेली असावीत.**

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने नुकतेच जारी केलेल्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, धार्मिक स्वातंत्र्याच्या गंभीर उल्लंघनाची जबाबदारी आणि ते खपवून घेतल्याबद्दल या संस्थांवर निर्बंध लादले गेले पाहिजेत. या निर्बंधांमध्ये त्या व्यक्तींची किंवा संस्थांची मालमत्ता गोठवली जावी किंवा त्यांना अमेरिकेत प्रवेश करण्यास बंदी घातली जावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

याबरोबरच आयोगाने अशी मागणी केली आहे की, आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य कायद्यानुसार (IFRA) व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे , पद्धतशीर, सातत्याने आणि अत्यंत गंभीर स्वरुपाच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या उल्लंघनामध्ये सहभागी असल्याबद्दल आणि ते खपवून घेतल्याबद्दल भारताला 'विशेष चिंता असलेला देश' जाहीर केले जावे.

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने त्यांच्या रिपोर्टमध्ये दावा केला आहे की, सरकारने कथितपणे धार्मिक अल्पसंख्याक समुदाय आणि त्यांच्या प्रार्थनास्थळांना लक्ष्य करणारे नवीन कायदे आणल्याने आणि त्यांची अंमलबजावणी केल्याने भारतातील धार्मिक स्वातंत्र्याची स्थिती ही २०२५ मध्ये सतत खालावत गेली.

या अहवालात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, अनेक राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे तयार करणे किंवा ते अधिक कडक करण्यासाठी त्यामध्ये कारावासाच्या कठोर शिक्षा (पान २ वर)

## कटकमध्ये रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये लागली आग

### • १० रुग्णांचा होरपळून मृत्यू



वृत्तसंस्था । भुवनेश्वर

ओडिशा सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या एससीबी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयमधील अतिदक्षता विभागात (आयसीयू) सोमवारी पहाटे भीषण आग लागल्याने किमान १० रुग्णांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी दिली आहे.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, रुग्णांना सुरक्षित स्थळी हलवत असताना रुग्णालयातील सुमारे ११ कर्मचाऱ्यांना भाजल्यामुळे दुखापत झाली. ही आग कदाचित शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी. आग पहाटे २.३० ते ३.०० च्या दरम्यान लागली. अग्निशमन दलाचे जवान तातडीने रुग्णालयात पोहोचले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या आगीच्या घटनेत रुग्णांचा मृत्यू झाल्याबद्दल शोक व्यक्त केला आणि पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना २ लाख रुपयांची मदत जाहीर केली. (पान २ वर)

## घरोघरी पेटणार पुन्हा केरोसीनचे स्टो?

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने पेट्रोल पंपावर रॉकेल उपलब्ध करून देणार : नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ**

राज्यभरात एलपीजी गॅसचा तुटवडा असताना. गॅसच्या टाक्यांसाठी सामान्य नागरिक रांगेत उभे असताना. हॉटेल, चहा, नाश्त्याचे स्टॉल गॅसअभावी बंद होत असतानाही नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत असल्याचा दावा केला. सरकारी तेल कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवर केरोसीन विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जाणार असल्याची घोषणाही त्यांनी विधान परिषदेत केली.

विधान परिषदेत अभिजित वंजारी यांनी नियम ९३ अन्वये उपस्थित केलेल्या सूचनेवर निवेदन करताना भुजबळ यांनी राज्यभरात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत असल्याचा दावा केला.

एलपीजी पुरवठा साखळी सुरळीत राहावी. काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांना गॅस टाक्यांचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# एसटीच्या ई-बस ठरत आहेत तोट्याचं कारण

## दरवर्षी बसेल १ हजार ४८९ कोटींचा फटका; महामंडळाची प्रकल्प रद्दची मागणी

वृत्तसंस्था । मुंबई

पर्यावरणपूरक वाहतूक ठरू शकणारा एसटी महामंडळातील ई-बस प्रकल्पच आता आर्थिक गळचेपीचे कारण ठरत असल्याचे सांगत एसटीने सरकारला घरचा अहेर दिला आहे. ५ हजार १५० ई-बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या योजनेमुळे एसटीला दरवर्षी तब्बल १ हजार ४८९ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागणार आहे. सरकारकडून सहा महिन्यांपासून व्यवहार्यता पूरक निधी (व्हीजीएफ) प्राप्त झालेला नाही. यामुळे रोजचा कारभार हाकणे अशक्य असल्याने ई-बस योजना रद्द करावी, अशी भूमिका एसटी महामंडळाने राज्य सरकारकडे मांडली आहे.

**१७ मार्च रोजी विशेष बैठक**

ना नफा ना तोटा या तत्त्वावर सुरू झालेले प्रवासी महामंडळ तोट्याचे आकडे पुढे करत निधीसाठी महत्त्वाच्या प्रकल्पांतून दबावतंत्र वापरत असल्याची चर्चा संघटनांमध्ये आहे. अशातच परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना पत्र पाठवले आहे. ई-बसच्या अडचणींबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १७ मार्च रोजी एका विशेष बैठक होत आहे.

राज्य सरकारच्या ई-वाहन धोरण २०२१ नुसार, नोव्हेंबर २०२१मध्ये मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापण्यात आली. या समितीच्या एसटी पुनरुज्जीवन आराखड्यातील शिफारशीनुसार एसटी ताफ्यातील १५ टक्के अर्थात, ५ हजार (पान २ वर)




या प्रकल्पांतर्गत सध्या धावत असलेल्या नऊ मीटर लांबीच्या ई-बसमुळे ६६.४४ कोटी आणि १२ मीटर लांबीच्या ई-बसमुळे ९४.८७ कोटी असा एकूण १६१.३१ कोटींचा तोटा झाला आहे. २०२६-२७ मध्ये अपेक्षित २,९०८ बसगाड्यांमुळे एकूण ७१८ कोटींचा तोटा अपेक्षित आहे. भविष्यात ५ हजार १५० बसगाड्यांमुळे दरवर्षी १ हजार ४८९ कोटींचा तोटा होण्याची भीती आहे.

## वीज यंत्रणेतील बिघाडाने बस जळून खाक

वृत्तसंस्था । सांगली



वीज यंत्रणेतील बिघाडामुळे लागलेल्या आगीत प्रवासी बस जळून खाक झाल्याची घटना सांगलीत सोमवारी घडली. महापालिकेच्या अग्निशमन पथकाने आग आटोक्यात आणली असली तरी आग विझवेपर्यंत बसचा सांगडाच उरला होता. या आगीत कुणाला इजा झाली नाही. पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेसाठी सांगलीला येत असलेल्या दोन मुलींची महत्त्वाची कागदपत्रे जळून नष्ट झाली. एमबी लिंक्स प्रवासी वाहतूक कंपनीची बस (एमएच ०९ जीजे ६९९७) लातूरहून कोल्हापूरला निघाली होती. आज सकाळी ६ वाजेच्या सुमारास सांगलीतील स्टेडियमजवळ आल्यानंतर बसमधून अचानक धूर येउ लागला. बस चालकांने प्रवाशांना तात्काळ खाली उतरण्यास सांगितले. यामुळे प्रवासी खाली उतरले आणि बसने पेट घेतला.

# राज्यातील तीन वैद्यकीय महाविद्यालयांना स्वायत्तता

## माजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

वृत्तसंस्था । मुंबई

**मुंबईतील ग्रँण्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थांना स्वायत्तता मिळणार आहे. याविषयी सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.**



स्वायत्ततेसंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बी. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक आणि विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे या समितीचे सदस्य सचिव असतील. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी केला आहे.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची सध्याची प्रशासकीय आणि शैक्षणिक संरचना, स्वायत्त दर्जा देण्याची आवश्यकता, संभाव्य लाभ तसेच देश-विदेशातील यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास ही समिती करणार आहे. (पान २ वर)

## राष्ट्रीय महामार्गांवरील प्रवास १ एप्रिलपासून महागणार!

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

राष्ट्रीय महामार्ग प्रधिकरणाने (NHAI) २०२६-२७ या आर्थिक वर्षात फास्टॅगच्या पासची किंमत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे खासगी वाहनचालकांना १ एप्रिल २०२६ पासून पाससाठी आधीपेक्षा जास्त किंमत मोजावी लागणार आहे. राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२५पासून फास्टॅगचा वार्षिक पास घेण्याची सुविधा सुरू केली होती. यामुळे टोल भरण्याच्या वेळेत बचत होऊन प्रवास अधिक जलद झाला आहे. यापूर्वी या पासची किंमत ३,००० रुपये होती. आता यामध्ये २.५ टक्क्यांची वाढ झाली असून, प्रवाशांना ३,०७५ रुपयांचा पास विकत घ्यावा लागणार आहे. हा पास केवळ खासगी (नॉन-कमर्शियल) वाहनांसाठी उपलब्ध असणार आहे. ३,०७५ रुपयांचा वार्षिक पास घेतल्यावर हा पास एका वर्षासाठी किंवा २०० वेळा टोलनाका ओलांडेपर्यंत वैध असेल.

# चुकीच्या आहारामुळे प्रौढांमध्ये दिसणारे आजार आता लहान मुलांमध्ये!

## जंक फूडचे वाढते प्रमाण आणि संतुलित आहाराचा अभाव!

वृत्तसंस्था । मुंबई

**बदलती जीवनशैली, जंक फूडचे वाढते प्रमाण आणि संतुलित आहाराचा अभाव यामुळे भारतातील मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे पूर्वी प्रौढांमध्ये आढळणारे अनेक आजार आता लहान मुलांमध्ये दिसू लागले आहेत. त्यामुळे भविष्यातील पिढीच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे.**



व्यस्त दिनचर्येमुळे अनेक पालक मुलांना तयार पदार्थ किंवा बाहेरचे खाणे देतात. मात्र यामुळे मुलांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मुलांच्या आहारात संतुलित आणि पौष्टिक पदार्थांचा समावेश करणे आवश्यक आहे.डॉक्टरांच्या मते, मुलांना रोज फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये, दूध आणि प्रथिनेयुक्त पदार्थ देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर जंक फूड, साखरयुक्त पेये आणि जास्त तेलकट पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवले पाहिजे. नियमित व्यायाम, खेळ आणि शारीरिक हालचालींनाही प्रोत्साहन देणे तितकेच महत्त्वाचे आहे.

लहान मुलांमध्ये लठ्ठपणा, प्री-डायबेटीस, उच्च रक्तदाब आणि हृदयाशी संबंधित समस्या वाढताना दिसत आहेत. या आजारांचे प्रमाण पूर्वी प्रामुख्याने प्रौढांमध्ये दिसत होते. मात्र आता १० ते १५ वर्षांच्या मुलांमध्येही अशा आजारांची लक्षणे दिसू लागल्याने डॉक्टरांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे.यामागील मुख्य कारण म्हणजे मुलांच्या आहारातील मोठे बदल. पॅकेज्ड स्नॅक्स, फास्ट फ ूड, साखरयुक्त पेये आणि तेलकट पदार्थ यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दुसरीकडे फळे, भाज्या, कडधान्ये आणि पौष्टिक पदार्थांचा आहारात अभाव आहे. त्यामुळे शरीराला आवश्यक पोषणमूल्ये मिळत नाहीत आणि विविध आजारांचा धोका वाढत असल्याचे ठाणे येथील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ संदीप केळकर यांनी सांगितले. शहरी भागात ही समस्या अधिक तीव्र असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. शाळा, ट्युशन आणि स्क्रीनसमोर घालवला जाणारा जास्त वेळ यामुळे मुलांची शारीरिक हालचाल कमी झाली आहे. त्याचबरोबर जंक फूडच्या जाहिराती आणि आकर्षक पॅकेजिंगमुळे मुलांमध्ये अशा पदार्थांची सवय वाढत आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते, बालपणात तयार होणाऱ्या आहाराच्या सवयी आयुष्यभर टिकतात. जर लहानपणीच चुकीच्या (पान २ वर)

## मंत्रालयातील दुसरे पंत गो. श्री. पंतबाळेकुंद्रींचं निधन

वृत्तसंस्था । मुंबई

**मनोहर जोशींच्या कार्यकाळात दबदबा, आठवणांनी उजाळा**



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्यासमवेत काम केलेले शिवसेना ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांची ओळख राजकीय वर्तुळात पंत म्हणून होती. तर, त्यांच्या कार्यकाळात मंत्रालयात सहसचिव असलेल्या गो.श्री.पंतबाळेकुंद्री यांचीही ओळख पंत अशीच होती.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागातून सहसचिव म्हणून निवृत्त झालेले नामवंत अधिकारी गो.श्री. पंतबाळेकुंद्री यांचे आज (सोमवार १६ मार्च २०२६) ठाणे येथे निधन झाले, ते ८९ वर्षांचे होते. (पान २ वर)

# लोकअदालतीत १८ हजार ५९४ प्रकरणांचा निपटारा

## २६ कोटी १ लाख ७६ हजारांची नुकसान भरपाई वसूल

प्रतिनिधी । धुळे

**राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये वादपूर्व व प्रलंबित अशा एकूण १८ हजार ५९४ प्रकरणांचा निपटारा करण्यात येवून २६ कोटी ०१ लाख ७६ हजार रुपयांची रक्कम नुकसान भरपाई म्हणून वसूल करण्यात आली. धुळे जिल्हयातील सर्व न्यायालयात दि. १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात आले होते.**




सदर लोकअदालतमध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे आणि वादपुर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. न्यायालयातील प्रलंबित ६ हजार ३८१ प्रकरणे ज्यामध्ये धनादेश न वाटल्याबाबतच्या केसेस, मोटार अपघात भरपाई प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्याचप्रमाणे दाखलपुर्व ७९ हजार ५२४ प्रकरणे ज्यामध्ये महापालिका, ग्रामपंचायत, विज थकबाकी प्रकरणे, बँकेची थकबाकी प्रकरणे, फायनान्स कंपनीचे थकबाकी प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरणे इत्यादी ठेवण्यात आली होती.

सदर प्रकरणांपैकी ४५४ प्रलंबित प्रकरणे व १८ हजार १४० दाखलपुर्व प्रकरणे असे एकुण १८ हजार ५९४ समोपचाराने राने निकाली निघाली. सदर लोकअदालतमध्ये एकुण २६ कोटी ०१ लाख ७६ हजार रूपयांची वसुली व नुकसान भरपाई झाली. मोटार अपघात प्रकरणापैकी १६० प्रकरणे तडजोडीने निकाली होवुन १३, २६,२५,००० पक्षकारांना वसुल करून देण्यात आली.

लोकअदालत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सदर लोकअदालतसाठी धुळे जिल्हा वकील संघ तसेच तालुका वकील संघ, पक्षकार, पोलीस, सर्व बँका, महानगरपालिका, सर्व ग्रामपंचायत, महावितरण कंपनी, सर्व न्यायालयीन कर्मचारी, विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी इत्यादींनी सहकार्य केले. शेवटी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रविण एन. कुलकर्णी यांनी आभार व्यक्त केले.

## सोन बु. येथे नदीत बुडाल्याने बालकाचा मृत्यू



प्रतिनिधी । नंदुरबार

नदीत पोहण्यासाठी गेलेल्या सहा वर्षीय बालकाचा पाण्यात बुडूत मृत्यू झाल्याची घटना सोन बु. गावीत घडली. याप्रकरणी धडगाव पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. धडगाव तालुक्यातील सोन बु. येथील आर्यन उर्फ अश्विन पिंटा पावरा हा बालक गावातील खाढ नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेला. परंतु पोहतांना नदीतील पाण्यात बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला.

यावेळी त्यास पाण्यातून बाहेर काढून धडगाव रूग्णालयात दाखल दाखल केले असता त्याला डॉक्टरांनी तपासून अश्विन पावा या बालकास मृत्यू घोषीत केले. याबाबत पिंटा चमऱ्या पावरा यांनी धडगाव पोलीस ठाण्यात खबर दिली त्यानुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आले आहे.

# संपादकीय

## महासंघर्षाचा बिगुल

केंद्रीय निवडणूक आयोगाने पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक घेण्याची घोषणा केली. यामध्ये पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या महत्त्वाच्या राज्यांचा समावेश असल्याने भारतीय लोकशाहीच्या व्यासपीठावर आगामी कालावधीमध्ये एका महासंघर्षाचा बिगुल वाजला आहे.पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम ही राज्ये आणि पुद्दुचेरी हा केंद्रशासित प्रदेश या राज्यांच्या विधानसभासाठी पुढील महिन्यात मतदान होणार आहे. या राज्यांमधील विद्यमान परिस्थिती बघता आसाम आणि पुद्दुचेरी येथे भाजपाची किंवा एनडीएची सत्ता आहे. बाकी तीन राज्यांमध्ये भाजपाला अद्यापही सत्तेमध्ये शिरकाव करता आलेला नाही. गेल्या काही कालावधीपासून भाजपाचे नेते जाणीवपूर्वक या राज्यांमध्ये शिरकाव करण्याचा प्रयत्न करत आहेत. साहजिकच ज्या राज्यात भाजपाची सत्ता नाही तेथे होणारी ही निवडणूक एक मोठा राजकीय संघर्ष ठरणार आहे. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये. गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये ज्या प्रकारे संघर्ष सुरू आहे त्याचा शेवटचा अध्याय म्हणजे ही निवडणूक ठरणार आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारला पुरून उरलेल्या एकमेव मुख्यमंत्री म्हणूनच ममता बॅनर्जी यांच्याकडे पहावे लागते. बंगालमधील सत्ता आपल्या हातातून कोणत्याही प्रकारे जाऊ द्यायची नाही याच एका दिशेने ममता बॅनर्जी यांचे सर्व निर्णय होत असतात. गेल्या निवडणुकीमध्ये भाजपाने चांगली कामगिरी केली होती. ७० पेक्षा जास्त आमदार भाजपाने विधानसभेत पाठवले होते. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्येसुद्धा भाजपने लक्षणीय कामगिरी केली होती. याच पार्श्वभूमीवर भाजपाला या राज्यामध्ये आता सत्ता मिळवण्याबाबत थोडी आशा वाटत आहे. भाजप नेहमीच निवडणुकीच्या मोडमध्ये असल्यामुळे गेल्या दोन ते अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी बंगालमध्ये लक्ष केंद्रित केले आणि ममता बॅनर्जी यांनाही विविध कारणांनी लक्ष्य केले होते. आता तर निवडणुकीची घोषणा झाल्यामुळे निवडणुकीच्या प्रचार काळातही हा संघर्ष टिपेला पोचण्याचे संकेत मिळत आहेत. दुर्दैवाने या राज्यामध्ये ज्या दोन पक्षांनी दीर्घकाळ सत्ता उपभोगली ते कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेस हे मात्र उपेक्षित पद्धतीने आपले राजकारण करत आहेत. या निवडणुकीमध्ये ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यामध्येच प्रमुख लढत होणार आहे हे उघड आहे. तशीच काहीशी परिस्थिती तामिळनाडूमध्येसुद्धा आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे नेते स्टॅलिन यांनी नरेंद्र मोदी सरकारवर टीका करण्याची एकही संधी गेल्या काही कालावधीमध्ये सोडलेली नाही. भाजपाला या राज्यामध्ये कधीच यश मिळाले नाही. फक्त जेव्हा जेव्हा त्यांनी कोणाबरोबर युती केली तेव्हाच त्यांना यश बघता आले. यावेळी अण्णाद्रमुक या पक्षासोबत त्यांची युती आहे. पण जयललिता यांचे निधन झाल्यानंतर या पक्षाची शक्ती कमी झाली आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी जनतेला आवडेल असा राज्यकारभार करून आपण पुन्हा सत्तेवर येऊ याची खात्री दिली आहे. अर्थात, तामिळनाडूच्या नवीन राजकीय चित्राप्रमाणे विजय थलपती या सुपरस्टार अभिनेत्याचा नवीन राजकीय पक्ष काय करामत करतो हेसुद्धा पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. द्रमुक आणि अद्रमुक या दोन प्रमुख पक्षांना अलटून पालटून सत्ता देण्याचा नेहमीच तामिळनाडू जनतेचा कल असतो. त्यात आता विजय थलपती यांच्या पक्षाची एन्ट्री झाली आहे. या राज्यामध्येसुद्धा एक मोठा राजकीय संघर्ष पाहायला मिळणार आहे. केरळमध्ये भाजपाचे कधीही अस्तित्व नाही. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडी आणि डाव्या पक्षांच्या नेतृत्वाखालील डावी लोकशाही आघाडी यांच्यामध्येच नेहमी या राज्यामध्ये लढत होत असते. आणि ह्याच आघाड्यांना अलटून–पालटून सत्ता मिळत होती.

# तळोदा येथील गॅस गोदामांची पुरवठा विभागाकडून तपासणी

प्रतिनिधी । तळोदा

**येथील गॅस सिलिंडरच्या पुरवठ्याबाबत ग्राहकांकडून केल्या जाणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन येथील पुरवठा विभागाने शहर व ग्रामीण भागातील गॅस गोडाऊनला भेटी देऊन दप्तर आणि पुरवठ्याची खातरजमा केली. दरम्यान, गॅस सिलिंडर वितरणासाठी वापरली जाणारी ऑनलाईन वेब साईटच्या तांत्रिक अडचणीमुळे वितरणात अडथळे येत असल्याने समस्या निर्माण झाल्याचे सांगण्यात आले.**



आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने सध्या गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याची जोरदार अफवा पसरली. त्यामुळे एजन्सीजकडून गॅस सिलिंडर वितरणासाठीची ऑनलाईन नोंदणी व घरपोच सिलेंडर डिलिव्हरी गेल्या आठ ते दहा दिवसांपासून बंद झाल्यामुळे नागरिकांमध्ये अधिकच भीती निर्माण झाली. त्यामुळे गॅस गोदामांच्या ठिकाणी ग्राहकांचा मोठ्या लांबचलांब रांगा लागत असल्याचे चित्र आहे. अक्षरशः ग्राहक उन्हातान्हात उभे राहत असल्याची वस्तुस्थिती आहे. एवढेच नव्हे तर कर्मचारी व ग्राहकांमध्ये वादावादी देखील होत असल्याचे चित्र आहे. पुरवठा शाखेतील कर्मचाऱ्यांनाही ग्राहकांनी चांगलेच धारेवर धरले होते. त्यांनी वितरणबाबत तक्रारी केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पुरवठा निरीक्षक द्वारका आगळे यांच्या पथकाने तळोदा शहरातील किरण गॅस एजन्सी व बोरद येथील लीना इंडियन एजन्सी या दोनहीं वितरकांच्या गोदामास शनिवारी भेट देऊन पाहणी केली. तेथे मुबलक प्रमाणात गॅस साठा उपलब्ध असल्याचे दिसून आले. याशिवाय दप्तराची देखील पडताळणी केली. त्यात कुठल्याही प्रकारचा त्रुटी आढळून आल्या नाहीत. मात्र वितरण प्रणालीची साइटमध्ये तांत्रिक अडचणीमुळे समस्या निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वितरणबाबत गॅस एजन्सीजकडून सातत्याने आढावा घेतला जात असल्याचेही पुरवठा विभागाने सांगितले.

# आता शेतकऱ्यांना मिळणार जी–९ केळीची दर्जेदार रोपे

## शहादा खरेदी-विक्री संघाचा नवा उपक्रम

प्रतिनिधी । शहादा

**बियाणे, खते आणि कीटकनाशके विक्रीच्या वाढत्या स्पर्धेत आपले वेगळेपण सिद्ध करत शहादा तालुका सहकारी खरेदी विक्री संघाने आता वेळी रोप विक्रीच्या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. आनंद (गुजरात) येथील प्रसिद्ध आयकॉनिक इंटरनॅशनल कँपनीच्या मजी व्हरायटीफ रोपांच्या विक्रीचा शुभारंभ नुकताच उत्साहात करण्यात आला.**

खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष काशिनाथ पाटील यांच्या हस्ते पहिल्या रोपांच्या गाडीचे पूजन करण्यात आले. यावेळी शेतकरी शरद पाटील यांच्याकडे रोपांचा क्रेट सुपूर्द करून विक्रीचा श्रीगणेशा झाला. याप्रसंगी प्रा. डी. सी. पाटील, संचालक रवींद्र विठ्ठल पाटील, सुदाम सोमजी पाटील, विनोद चिंतामण पाटील, अंबालाल पाटील, विश्वनाथ पाटील, आयकॉनिक कँपनीचे मार्केटिंग हेड मच्छिंद्र माळी, मॅनेजर अनिल पाटील आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघाचे आधारस्तंभ दीपक पाटील यांच्या म ार्गदर्शनाखाली आणि माजी चेअरमन प्रा. मकरंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली, संघाचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना दर्जेदार सेवा देण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत २ लाख रोपांची नोंदणी झाली असून, मे अखेरपर्यंत ५ लाख रोपांच्या विक्रीचे उद्दिष्ट आहे.

# पान १ वरुन

### आरएसएस, 'रॉ'वर......

समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. भारतीय अधिकाऱ्यांनी नागरिक आणि धार्मिक निर्वासितांना मोठ्याप्रमाणावर ताब्यात घेण्यास आणि त्यांना बेकायदेशीरपणे हद्दपार करण्यास मदत केली. तसेच धार्मिक अल्पसंख्याक समुदायांविरुद्ध होणाऱ्या हिंसक हल्ल्यांकडे दुर्लक्ष केले. रिपोर्टमध्ये २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता त्या 'पहलगाम' दहशतवादी हल्ल्याचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. या घटनेमुळे भारतात मुस्लिम विरोधी भावना वाढली. ज्यामध्ये लक्ष्य करून केलेल्या हल्ल्यांचा समावेश होता. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने कर्नाटक आणि उत्तर प्रदेशमधील काही घटनांचा उल्लेख रिपोर्टमध्ये केला आहे. या रिपोर्टनुसार, उत्तर प्रदेशात, एका हिंदू राष्ट्रवादी गटाचे सदस्य असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तींनी कथितपणे काश्मीर हल्ल्यात मारल्या गेलेल्यांचा बदला घेण्याची शपथ घेत एका मुस्लिम रेस्टॉरंट कामगाराची गोळ्या घालून हत्या केली. याबरोबरच भारत सरकारने त्यांच्याकडून बेकायदेशीर स्थलांतरित मानले जाणाऱ्या धार्मिक अल्पसंख्याकांच्या हद्दपारीचे समर्थन करण्यासाठी कश्मीरमधील हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा वापर केला. पुढे असा दावा करण्यात आला आहे की, भारतीय अधिकाऱ्यांनी सुमारे ४० रोहिंग्या निर्वासितांना ताब्यात घेतले. ज्यामध्ये १५ ख्रिश्चनांचा समावेश होता. या सर्वांना बर्मीज किनारपट्टीजवळील आंतरराष्ट्रीय समुद्रात नेण्यात आले. तसेच त्यांना फक्त लाइफ वेस्ट देऊन बर्मीज किनाऱ्यापर्यंत पोहत जाण्यास भाग पाडले. याबरोबरच या रिपोर्टमध्ये वक्फ (सुधारणा) विधेयकासारख्या कायद्यावरही टीका करण्यात आली आहे. ज्यानुसार मशीद, मदरसे आणि दफनभूमी यांसारख्या मुस्लिमांच्या मालकीच्या जमिनींच्या व्यवस्थापनासाठीच्या बोर्डांमध्ये गैर–मुस्लिम सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे.

### एसटीच्या ई–बस......

१५० ई–बसगाड्या भाडेतत्त्वावर (जीसीसी मॉडेलवर) दाखल करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. यासाठी २ नोव्हेंबर २०२३ मध्ये एसटीने ईव्हे ट्रान्स (एमएसआर) प्रा. लि. यांच्याशी करार केला. एसटीच्या ई–बससाठी राज्य सरकारने व्यवहार्यता पूरक निधी उपलब्ध करण्याची तयारी दर्शवली. जुलै २०२३ आणि सप्टेंबर २०२४ मध्ये ३ हजार १८९ कोटींचा प्रस्ताव महामंडळाने राज्य सरकारकडे पाठवला. मात्र तो मंजूर झालेला नाही. यामुळे रोजचा कारभार करणे अशक्य असल्याचे सांगत ई–बस प्रकल्प रद्द करावा, असे राज्य सरकारला महामंडळाने सूचित केले आहे.

### राज्यातील तीन वैद्यकीय......

समितीकडून एम्स, पीजीआय चंदीगड आणि टाटा मेमोरिअलसारख्या संस्थांच्या व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांसाठी संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषद यांची रचना आणि अधिकार, संचालक/अधिष्ठाता यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या, स्वायत्त व्यवस्थेसाठी आवश्यक आर्थिक आणि प्रशासकीय यंत्रणेबाबत शिफारस करणे, आर्थिक स्वातंत्र्य, अंतर्गत महसूल निर्मिती, लेखापरीक्षण व्यवस्था, तसेच कर्मचारी आणि अध्यापकांसाठी नवीन सेवा अटी आणि धोरणे याबाबत समिती शिफारसी करणार आहे. आवश्यक कायदेशीर, प्रशासकीय आणि धोरणात्मक बदलांबाबतही समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे.

### चुकीच्या आहारामुळे......

सवयी लागल्या, तर भविष्यात हृदयविकार, मधुमेह आणि इतर गंभीर आजार होण्याचा धोका अनेकपटीने वाढतो. त्यामुळे या समस्येकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते असेही डॉ केळकर म्हणाले. तज्ज्ञांनी पालकांनाही याबाबत सावध केले आहे.

### मंत्रालयातील दुसरे पंत......

त्यांच्या मागे पत्नी, पुत्र अभिजीत आणि विवाहित कन्या तसेच नातवंडे असा परिवार आहे. पंत यांच्यावर उद्या १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता ठाणे येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील.

### कटकमध्ये रुग्णालयाच्या......

तसेच, जखमींना ५० हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे. पंतप्रधानांनी फोनवरून मुख्यमंत्री माझी यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थितीचा आढावा घेतला. राज्य सरकारने या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणाही केली आणि अग्निशमन दलाच्या महासंचालकांना या प्रकरणाची चौकशी करून, त्वरित अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

## बालभारती पाठ्यपुस्तक निर्मिती समितीवर डॉ. ज्योत्स्ना जाधव

प्रतिनिधी । शिरपूर

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्यावतीने इयत्ता तिसरीच्या शारीरिक शिक्षण व निरामयता विषयाच्या पाठ्यपुस्तक निर्मितीचे काम हाती घेण्यात आले आहे. या विषयाच्या समीक्षण सत्रासाठी तज्ज्ञ म्हणून शिरपूर येथील मुकेशभाई आर. पटेल मिलिटरी स्कूलच्या शिक्षिका डॉ. ज्योत्स्ना ईश्वर जाधव यांची निवड करण्यात आली आहे. पुणे येथील बालभारती कार्यालयात १२ व १३ मार्च रोजी हे विशेष समीक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. या निवडीबद्दल एसव्हीकेएम अध्यक्ष माजी शालेय शिक्षण, क्रीडा व कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, भूपेशभाई पटेल, चिंतनभाई पटेल, राजगोपाल भंडारी, डायरेक्टर गिरीजा मोहन यांनी कौतुक केले.

# पहूर बसस्थानक परिसर सीसीटीव्हीच्या कक्षेत पोलीस प्रशासनाकडून आठ कॅमेरे बसविले

प्रतिनिधी । पहूर, ता. जामनेर

जळगाव ते छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३–एफ वरील पहूर येथील दादासाहेब कॅप्टन डॉ. एम. आर. लेले बसस्थानक परिसर आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीत आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे यांच्याहस्ते या कॅमेऱ्यांचे उद्घाटन करून यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवणे, परिसरात वाढलेल्या चोऱ्यांवर नियंत्रण मिळवणे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे या उद्देशाने ही सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात या यंत्रणेचे लोकार्पण करण्यात आले.

परिसरात एकूण आठ कॅमेरे बसविण्यात आले असून येथील सर्व हालचालींचे निरीक्षण थेट पोलीस ठाण्यातील अधिकारी कक्षातून करता येणार आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे यांनी सांगितले की, वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही यंत्रणा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे संशयास्पद हालचालींवर तत्काळ लक्ष ठेवणे शक्य होणार असून गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होईल. दरम्यान, यापूर्वी पहूर कसबे ग्रामपंचायतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते ईश्वर हिवाळे यांनी पत्रव्यवहार केला होता.

मात्र ग्रामपंचायतीकडून पुढाकार न घेतल्याने अखेर पोलीस प्रशासनाने पुढाकार घेत ही यंत्रणा कार्यान्वित केली. त्यामुळे परिसरातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यास मोठी मदत होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

# सूरमाज फाउंडेशनतर्फे गरजू कुटुंबांना शीरखुर्मा किटचे वितरण

प्रतिनिधी । चोपडा

**पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने सूरमाज फाउंडेशनतर्फे चोपडा शहरातील गरीब व गरजू कुटुंबांना ४०० ईद विशेष शीरखुर्मा किट वितरित करण्यात आले. या किटमध्ये बदाम, काजू, खोबरे, किसमिस, खारीक, चारोळी, साखर, सिवईया आणि तूप यांचा समावेश होता.**




ईद सणाच्या गोडी आणि आनंदाचे प्रतीक असलेल्या या वस्तू गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचवून त्यांच्या ईदचा आनंद अधिक वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा वितरण कार्यक्रम दि.१६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला. या प्रसंगी सूरमाज फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी उस्मान शेख, अबुलैस शेख, डॉ. रागीब, शोएब शेख, जुबेर बैग, शेख मुजाहिद–ए–इस्लाम, शमीम शेख, ॲडव्होकेट असीम, प्रा. डॉ. मोहम्मद जुबेर शेख तसेच इतर सहकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

सूरमाज फाउंडेशन ही एक सक्रिय सामाजिक संस्था असून ती शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि समाजसेवेच्या क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करत आहे. ही संस्था विधवांना पेन्शन उपलब्ध करून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अशिक्षित मुलींच्या शिवणकला वर्गांची फी भरणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, जनजागृती अभियान राबविणे तसेच समाजातील उत्कृष्ट कार्यांना प्रोत्साहन देणे अशा विविध समाजोपयोगी कार्यांमध्ये सक्रिय आहे.

चोपडा शहरातील गरीब व गरजू कुटुंबांना ४०० ईद विशेष शीरखुर्मा किट वितरित करण्यात आले. या किटमध्ये बदाम, काजू, खोबरे, किसमिस, खारीक, चारोळी, साखर, सिवईया आणि तूप यांचा समावेश होता. ईद सणाच्या गोडी आणि आनंदाचे प्रतीक असलेल्या या वस्तू गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचवून त्यांच्या ईदचा आनंद अधिक वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमाचा लाभ घेतलेल्या गरजू कुटुंबांनी फाउंडेशनचे मनापासून आभार मानले व या स्तुत्य कार्यासाठी शुभेच्छा आणि दुआ दिल्या. सूरमाज फाउंडेशन समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदत पोहोचविण्याच्या आपल्या संकल्पाशी कायम बांधील राहून यापुढेही असेच सेवा कार्य करत राहील, असा संकल्प त्यांनी केला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# झुरखेडे येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर उत्साहात

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते विविध योजनांचा शेकडो लाभार्थ्यांना मिळाला लाभ

प्रतिनिधी । जळगाव

**ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडविण्यासाठी महसूल व वन विभागाच्या १८ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान अंतर्गत धरणगाव तालुक्यातील झुरखेडे मंडळातील विठ्ठल मंदिर परिसरात शनिवारी सकाळी भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**



पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते विविध शासकीय योजनांचे लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रशासनाने नागरिकांच्या अडचणी संवेदनशीलतेने व तातडीने सोडविण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील नागरिकांना छोट्या कामांसाठी तालुका किंवा जिल्हा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी शासनाच्या सेवा थेट गावपातळीवर पोहोचविण्याचा हा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांची कामे या शिबिरातून तसेच पुढेही प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकारी व ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांना दिल्या.

या शिबिरात विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी आवश्यक असलेले एकूण ७६५ दाखले वितरित करण्यात आले असून त्यामध्ये जातप्रमाणपत्र १०२, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र ८९ आणि उत्पन्न प्रमाणपत्र १२४ यांचा समावेश आहे. सुलभ शेतकरी योजना अंतर्गत तालुक्यातील १५८१ गटांमधील तसेच झुरखेडे मंडळातील २६४ गटांमधील ७/१२ उताऱ्यावरील तुकडा हा शेरा कमी करून दुरुस्ती करण्यात आली व शेतकऱ्यांना दुरुस्त उतारे देण्यात आले. तसेच तगाई कर्ज, आयकट बोजे व बंडीग बोजे अशा कालबाह्य नोंदी कमी करून डिजिटल ७/१२ व ८अ उताऱ्यांचे वाटप करण्यात आले आणि डिजिटल ७/१२ च्या कायदेशीर वैधतेबाबत जनजागृती करण्यात आली. जिवंत ७/१२ मोहिमेअंतर्गत तालुक्यातील ७५९ मयत खातेदारांच्या वारस नोंदी घेऊन त्यांची नावे ७/१२ वर नोंदवून उतारे वितरित करण्यात आले. त्यामध्ये झुरखेडे मंडळातील १२५ प्रकरणांचा समावेश आहे. याशिवाय अकृषक तरतुदीतील सुधारणा, विकास आराखड्याच्या मंजुरीनंतर अकृषक परवानगीची नवीन व्यवस्था तसेच एकदाच अधिमूल्य भरण्याच्या सोप्या पद्धतीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार लक्ष्मण सातपुते, संदीप मोरे, मंडळ अधिकारी हेमंत महाजन, ग्राम महसूल अधिकारी शांतीलाल नाईक, हर्षल थाटे, मोहन चौगले, जावेद देशमुख, गौरव बाविस्कर, गट विकास अधिकारी किशोर वानखेडे, तालुका कृषी अधिकारी प्रशांत देसाई, दत्तात्रय वाघ, भूमी अभिलेख उपअधीक्षक तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुनील पाटील यांनी केले.प्रास्ताविक तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांनी केले.

# १५व्या वित्त आयोगातून १००० अंगणवाड्यांना केळीच्या आकाराचे बसण्याचे बाक उपलब्ध

प्रतिनिधी । जळगाव



बालकांना अंगणवाडीत अधिक आरामदायी आणि आकर्षक वातावरण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून जिल्ह्यातील सुमारे १००० अंगणवाड्यांना केळीच्या आकाराचे बसण्याचे बाक उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या उपक्रमामुळे अंगणवाडीत येणाऱ्या लहान मुलांना खेळत-खेळत बसण्याची आणि शिकण्याची सोय होणार आहे. केळीच्या आकाराचे रंगीत बाक मुलांना आकर्षित करणारे असून त्यामुळे अंगणवाडीतील शैक्षणिक वातावरण अधिक आनंददायी होण्यास मदत होईल. तसेच मुलांच्या बसण्याची व्यवस्थित व सुरक्षित व्यवस्था उपलब्ध होणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असून यामुळे अंगणवाड्यांची भौतिक सुविधा अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे जिल्हाभरात स्वागत होत असून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी पुढेही करण्यात येणार असल्याचे जि.प.प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## थोडक्यात

### नूतन मराठा महाविद्यालयातर्फे उत्कृष्ट कामगिरीबद्दल सत्कार

**जळगाव ।** नूतन मराठा महाविद्यालयात बारावी परीक्षेसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्यातर्फे ॲडव्हान्स लाइफ सपोर्ट ॲम्बुलन्स विथ ऑक्सिजन ड्रायव्हर यासह संपूर्ण कालावधीसाठी ज्या डॉ. चेतन अग्निहोत्री, डॉक्टर गिरीश पाटील, रेडियम राहुल बडगुजर, रेडियम मयूर भदाणे, चालक संदीप गवळे व चालक किशोर शिरुडे सेवा दिली त्याबद्दल महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार करताना यासाठी जिल्हा समन्वयक सोनवणे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

### स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाचे यश

**जळगाव ।** खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित मुळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालयाशी संलग्न स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने संस्कृत शिष्यवृत्ती योजनेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या अधिनस्त असलेल्या सेंट्रल संस्कृत विद्यापीठ , नवी दिल्ली यांच्या संस्कृत शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांची निवड झाली असून प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्येकी ६,००० रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर पात्रतेनुसार त्यांची निवड करण्यात आली. स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी व १२ वीच्या विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून महाविद्यालयासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# बहुळा धरण परिसरात प्राणिशास्त्र विभागाची शैक्षणिक क्षेत्र भेट

प्रतिनिधी । पाचोरा

**श्री सेठ मुरलीधरजी मासिंगका साहित्य, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा येथील प्राणिशास्त्र विभागामार्फत दि. १४ मार्च रोजी एस.वाय.बी.एस्सी. (झुलॉजी) विद्यार्थ्यांसाठी बहुळा धरणाच्या बॅकवॉटर परिसरात शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.**



या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी मत्स्यसंवर्धन, जलीय जैवविविधता तसेच गोड्या पाण्यातील परिसंस्था यांचा प्रत्यक्ष अभ्यास केला. येथे प्रामुख्याने चिलापी, रोहू, कतला तसेच विविध गोड्या पाण्यातील मासे आढळून आले व त्यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अभ्यास केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विषयाशी संबंधित व्यावहारिक ज्ञान मिळण्यास मदत झाली.

या क्षेत्रभेटीस प्राचार्य प्रा. डॉ. शिरीष पाटील, उपप्राचार्य प्रा. डॉ. वासुदेव वले, प्रा. डॉ. जे. व्ही. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राणिशास्त्र विभागातील प्रा.प्रदीप रुद्रसवाड, प्रा.विश्वजीत निकम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी परिसरातील विविध जलीय घटकांचे निरीक्षण केले. तसेच मत्स्यपालनाशी संबंधित माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रभेटीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक अभ्यासक्रमातील संकल्पना प्रत्यक्षात समजून घेण्यास मदत झाली, अशी माहिती प्राणिशास्त्र विभागातर्फे देण्यात आली.

# भाजपा जळगाव जिल्हा महानगरतर्फे इच्छादेवी चौक येथे आंदोलन





प्रतिनिधी । जळगाव

शहरातील इच्छादेवी चौक येथे भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा महानगरच्यावतीने काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांच्या निषेधार्थ जाहीर निषेध मोर्चा काढण्यात आला.

याप्रसंगी जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे उर्फे राजूमामा, जिल्हा महानगर अध्यक्ष दीपक सूर्यवंशी, पिंटू सपकाळे, भाजपाचे जिल्हा पदाधिकारी तसेच विविध मोर्चा आघाडी व नगरसेवक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री. गो.से. हायस्कूल येथे २७ मार्च रोजी महारोजगार मेळावा

प्रतिनिधी । पाचोरा



**पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित श्री. गो.से. हायस्कूल येथे दि. २८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता जिल्हास्तरीय महारोजगार भरती मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे.**

छत्रपती संभाजीनगर येथील टीम प्लस एच.आर.सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मुलाखती घेण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त होणार आहे. अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर परिसरातील इलेक्ट्रिकल बस बनवणारी कंपनीसह इतर तीन कंपन्यांचा या रोजगार मेळाव्यात सहभाग असेल. नियुक्त होणाऱ्या विद्यार्थ्यास १७ हजार ते १९ हजारपर्यंत स्टायपेंड मिळणार असून कॅन्टीन, बस सुविधा, इन्शुरन्ससह कंपनीचे लाभ मिळणार आहे.

तसेच कमवा व शिका या योजनेअंतर्गत बी. होकेशनल व डी.ओकेशनल डिग्री सुद्धा मिळवता येणार आहे. मुलाखतीकरिता येताना मार्कशीट, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, फोटो ३, बँक खाते झेरॉक्स, कॅन्सल चेक झेरॉक्स आवश्यक.
किमान कौशल्य विभागातील कोणत्याही ट्रेडचा पास विद्यार्थी, आयटीआय कोणताही ट्रेड पास विद्यार्थी, डिप्लोमा, इंजीनियरिंग वय वर्ष १८ ते ३५ असणारा विद्यार्थी या करता पात्र असेल.
महा रोजगार मेळाव्याचे उद्घाटन पाचोरा भडगाव तालुक्याचे माजी आमदार तथा पीटीसी संस्थेचे अध्यक्ष दिलीप वाघ, संस्थेचे चेअरमन संजय वाघ, संस्थेचे सचिव ॲड. महेश एस. देशमुख, संस्थेचे व्हाईस चेअरमन व्हि.टी.जोशी, शालेय समितीचे चेअरमन द खलील देशमुख, वासुदेव महाजन, बाळकृष्ण मुळे संचालक, टीम प्लस एच आर प्रायव्हेट सर्व्हिसेस लिमिटेड, प्राचार्य एन.आर.पाटील, उपप्राचार्य आर.एल.पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

### वाणिज्य प्रश्नमंजूषा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी । फैजपूर

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथील वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित वाणिज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या स्पर्धेसाठी वाणिज्य विभागातील एकूण ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.बी.वाघुळदे हे होते. यावेळी प्रा.डॉ.रवी एन. केसुर, प्रा.डॉ.आरती भिडे, डॉ. विवेक श्रावगे उपस्थित होते.

# जनसामान्यांचा प्रगतीचा ध्यास आंबेडकरी विचारातच : सपकाळे

प्रतिनिधी । जळगाव

भारतीय समाज व्यवस्थेला उन्नत आणि प्रगत अवस्थेला व जागतिक स्तरावर भारतीयांची ओळख निर्माण करून देणारा विचार हा आंबेडकरी विचारातूनच स्पष्ट होत जाऊन लोकशाही मूल्य, सामान्यांच्या जगण्याशी निगडित असणाऱ्या साऱ्या गोष्टी एक भावबंध निर्माण करतात आणि यातूनच राष्ट्रीय एकात्मतेची जी जोपासना होत जाते, असे मत महाराष्ट्र जनक्रांती मोर्चाचे अध्यक्ष मुकूंद सपकाळे यांनी केले.



धानोरा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या नियोजन बैठकीसंदर्भात ते बोलत होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी युवराज वानखेडे होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी साहित्यिक डॉ. मिलिंद बागुल होते. प्रा. डॉ. सत्यजित साळवे, बापूराव पानपाटील, नानाभाऊ आखाडे, सुनील सोनवणे, रवींद्र सोनवणे, प्रकाश मोरे, चतुर निकम, रवींद्र शिरसाट, रतिलाल शिरसाट, सुनंदा शिरसाट, चुडामन शिरसाट, कुसुम शिरोडकर, कुसुमबाई सोनवणे, खटाबाई शिरसाट, सुनंदा शिरसाट यांनी अतिथींचे स्वागत केले. सूत्रसंचालन राजेंद्र साळुंखे यांनी आभार विश्वनाथ पांडव यांनी मानले.

# मोटारसायकल चोर जेरबंद; पाचोरा पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी । पाचोरा

**पाचोरा पोलीस ठाणे गुन्हे शोध पथक यांनी अवघ्या ४ तासात आरोपीस ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयात चोरी झालेली मोटारसायकल हस्तगत करुन सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र १२ ताराचे आत पाचोरा न्यायालयात दाखल केले.**



फिर्यादी प्रशांत शंकर वाघ (रा. सातगांव डोंगरी, ता. पाचोरा) यांनी दि. १० मार्च रोजी साडेआठ वाजेच्या सुमारास राधाकृष्ण पेट्रोलपंप, जामनेररोड, येथे त्यांची हिरो कंपनीची फॅशन प्रो, लाल रंगाची मो.सा.क्र. १९, ४२११ ही पार्क करुन ठेवली असता ती आरोपी तुषार लक्ष्मण आघाडे, (रा. सातगांव डोंगरी, ता. पाचोरा) याने चोरी केल्याबाबत पाचोरा पोलीस ठाणे गु. रजि. क्रमांक ११९/२०२६, भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दि. १४ मार्च रोजी सदर गुन्हयाचे अनुषंगाने पाचोरा पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोहेकॉ. राहुल शिंपी, पोकॉ शरद पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाल्याने भारत डेअरी बसस्टॉप, पाचोरा येथे एक इसम हा त्याचे ताब्यातील मोटारसायकलसह संशयीतरित्या परिसराची टेहळणी करीत असल्याची बातमी मिळताच भारत डेअरी, बसस्टॉप, पाचोरा येथे जावुन सदर इसमाच्या ताब्यात गुन्हयात चोरी झालेली मोटारसायकलही मिळून आली. त्यास पाचोरा पोलीस ठाणे येथे आणुन पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांनी कसून चौकशी केली असता त्याने या गुन्ह्याची कबुली दिली. त्यास ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याचे कब्जातील गुन्हयात चोरी झालेली १५,०००/- रुपये किंमतीची हिरो कंपनीची फॅशन प्रो, लाल रंगाची मो. सा.क्र. १९ -४२११ ही जप्ती पंचनामा करुन जप्त केली आहे. तसेच सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र १२ तासाचे आत पाचोरा न्यायालयात दाखल केले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोहेकॉ राहुल शिंपी यांनी केला आहे.

# अपघाती निधन झालेल्या महसूल सहाय्यकाच्या कुटुंबाला २.६४ लाखांची मदत

## विद्यार्थिनींना शालेय साहित्य वाटप; जळगाव जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचा उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने दि. १४ मार्च सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. तहसील कार्यालय एरंडोल येथे कार्यरत असलेले दिवंगत महसूल सहाय्यक कै.शिवाजी महाजन यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर जिल्हाभरातील महसूल कर्मचारी बांधवांनी एकत्रितपणे मदत निधी जमा केला होता. या निधीतून २,६४,००० रु. (दोन लाख चौसष्ट हजार रुपये) इतकी मदत



जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते दिवंगत महाजन यांच्या कुटुंबीयांना प्रदान करण्यात आली.

जळगाव शहरातील कन्या छात्रालयातील एकूण ४२ विद्यार्थिनींना शालेय दप्तर, वह्या, कंपास साहित्य व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम महसूल कर्मचारी संघटना, जिल्हा जळगाव यांच्या माध्यमातून राबविण्यात आला. तसेच जळगाव शहरातील दानशूर अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींना शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. या कार्यक्रमास महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष योगेश्वर नन्नवरे, उपाध्यक्ष किरण बाविस्कर, कार्याध्यक्ष अतुल सानप, खजिनदार घनश्याम सानप, सरचिटणीस दिपक चौधरी, प्रसिद्धी प्रमुख गणेश हटकर, कायदेविषयक सल्लागार नम्रता नेवे, जळगाव तालुका अध्यक्ष संजय अंभोरे, ॲड. दीपक सपकाळे, भारतीय स्टेट बँकेचे गजानन पाटील, कॅनरा बँकेचे चंद्रकांत सूर्यवंशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रदीप बाविस्कर, रितेश छाजेड तसेच व्यावसायिक सदस्य राहुल नवगिरे, महेश सपकाळे, सुरेश महाले, महेश विसपुते, सुनिल निकम, चंद्रकांत खैरे, निलेश केदार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयाची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक अमोल जुमडे यांनी पार पडली.

# पाळधीतील पर्यटन विकासकामात मोठी दुर्घटना; स्लॅब कोसळून ७ कामगार जखमी

प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव तालुक्यातील पाळधी येथे साईबाबा मंदिर परिसरात सुरू असलेल्या पर्यटन विकास कामादरम्यान आज मोठी दुर्घटना घडली. बांधकाम सुरू असताना अचानक निर्माणाधीन स्लॅब (साचा) कोसळल्याने सात कामगार जखमी झाले असून त्यापैकी दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे.**

गेल्या वर्षभरापासून या ठिकाणी विविध बांधकामांची कामे सुरू आहेत. मात्र आज काम सुरू असतानाच अचानक स्लॅब कोसळल्याने घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत सात कामगार जखमी झाले असून त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींमध्ये दोन कामगारांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर विशेष उपचार सुरू असल्याचे समजते. दरम्यान, या घटनेमुळे बांधकाम स्थळावरील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कामगारांना आवश्यक असलेली सेफ्टी शूज, हेल्मेट व इतर सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आली होती का ? असे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

# भागपूर उपसा सिंचनसाठी २५० कोटींची मंजुरी

## वसंतवाडी तांड्याला महसुली गावाचा दर्जा, जळके येथे राजस्व समाधान शिबिर उत्साहात

प्रतिनिधी । नशिराबाद

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हे शिस्तीत व पारदर्शक पद्धतीने जनतेला सेवा देण्याचे व्यासपीठ आहे. बिनअडथळा मंजूर होणाऱ्या योजना आणि रयतेच्या न्यायासाठी उभे असलेले शासन या शिबिराच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचत आहे. जनतेच्या चेहऱ्यावरचे समाधान हाच आमचा खरा सन्मान आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. जळके (जळगाव) येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते गजानन महाराज मंदिरासमोरील पटांगणात उत्साहात पार पडले. विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी आयोजित या शिबिरात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.**



यावेळी शेतकरी व ग्रामस्थांनी भागपूर उपसा सिंचन योजनेसाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून तसेच वसंतवाडी तांड्याला महसुली गावाचा दर्जा देत व शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्याबद्दल पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, पोखरा योजनेचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा. तसेब शेतपानंद रस्ते तयार. करण्यासाठी शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच टायगर, बीस अशा शब्दांपेक्षा मी शेतकरी आहे हा अभिमान प्रत्येकाने बाळगावा, असे भावनिक प्रतिपादन करत त्यांनी उपस्थितांना प्रेरित केले. ना. गुलाबराव पाटील यांनी अधिकाऱ्यांना आवाहन केले की, अधिकाऱ्यांची एखादी सही ही एखाद्या कुटुंबाच्या भविष्यावरची सही असते, याची जाणीव प्रत्येक अधिकाऱ्यांनी ठेवली पाहिजे. शासनाच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचवणे ही प्रशासनाची जबाबदारी असून जिल्ह्यातील कोणताही पात्र लाभार्थी शासनाच्या लाभापासून वंचित राहू नये, याची विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले, महिलांच्या सहभागावर भर देताना त्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील महिला बचत गटांनी स्वावलंबनाचा नवा आदर्श निर्माण केला असून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळाला पाहिजे. प्रास्ताविक करताना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी सुलभपणे मिळावा या उद्देशाने राजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सूत्रसंचालनने नायब तहसीलदार प्राजक्ता केदार यांनी केले. तर तहसीलदार शीतल राजपूत यांनी आभार मानले. यावेळी जि.प.सदस्य पवन सोनवणे, गटविकास अधिकारी चंद्रकांत बोडरे, तालुका वैद्यकीय अधिकारी प्रमोद पांढरे, दूध संघाचे संबालक रमेश पाटील, अर्जुन पाटील, तालुकाप्रमुख शिवराज पाटील, नायब तहसीलदार डी. बी. जाधव, प्राजक्ता केदार, मंडळ अधिकारी प्रविण बेंडाळे, अजिंक्य आंधळे, उपसरपंच निवृत्ती पाटील, पी. के. पाटील, सरपंच विनोद पाटील, स्नेहा साठे, राजाराम राठोड, दिनेश पाटील, प्रदीप पाटील, धैर्यसिंग पाटील, बाजू शेरे तसेच जळके परिसरातील सरपंच, उपसरपंच, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, संचालक, ग्रामपंचायत सदस्य, लाभार्थी, अधिकारी कर्मचारी, महिला व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

● शेती मोजणीसह महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रक्रिया अधिक सोप्या करण्यात आल्या असून नागरिकांना दैनंदिन शासकीय कामांमध्ये येणाऱ्या अडचणी या शिबिराच्या माध्यमातून तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच बळीराजा शेतपानंद रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकयांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी शिबिरात उभारण्यात आलेल्या १० विविध विभागांच्या स्टॉलना भेट देऊन माहिती घेतली. तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या लाभांचा आढावा घेतला. शिबिरात डोमिसाईल २८. डिजिटल सातबारा १५६, सातबारा दुरुस्ती ३४, जात प्रमाणपत्र ६२, विविध शासकीय योजनांचे / प्रकरणे (संजय गांधी, विधवा, दिव्यांग, श्रावणबाळ) १५०, वारस नोंदी ४२, उत्पत्र दाखले ६६, फार्मर आयडी ४६ यासह इतर सेवांमधून एकूण ६४७ लाभार्थींना लाभ देण्यात आला. शिबिरात विविध विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले होते. सुमारे ६००-७०० नागरिकांची उपस्थिती नोंदवली गेली असून शासकीय सेवा थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात आल्या.

## थोडक्यात

### शालेय दप्तरांचे जि.प. शाळेत वाटप

**पारोळा ।** तालुक्यातील लोणी जिल्हा परिषद शाळेत शनिवारी श्री एंटरप्राइझेस, जळगाव यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली. लोणी खुर्द येथील समाधान पाटील, रुपाली पाटील, नितीन पाटील आणि तेजस्वी पाटील यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले.

## चोपड्यात सकल हिंदू समाजातर्फे 'द केरला स्टोरी-२' चित्रपट दाखविला मोफत

प्रतिनिधी । चोपडा

**सकल हिंदू समाजातर्फे आयोजित आशा टॉकीज चोपडा येथे 'द केरला स्टोरी-२' चित्रपट येथील युवतींना विनामूल्य दाखवण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.**



सत्य घटनांवर आधारित हा चित्रपट मुलींना 'लव जिहाद' सारख्या फसव्या प्रेमाच्या जाळ्यात कसे अडकवले जाते हे दाखविण्यात आले.

तसेच हिंदू युवतींमध्ये जास्तीत जास्त धर्मजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे हा चित्रपट मोफत दाखवून तब्बल ५०० युवतींना अशा कोणत्याच गोष्टीत अडकायला नको म्हणून प्रोत्साहन देण्यात आले. फक्त अवघ्या २४ तासांत मुलींना मोफत चित्रपट दाखवण्याचा हा प्रयत्न यशस्वी पणे पार पडला.

यासाठी खास नरेंद्र पाटील आणि नियोजनासाठी मुकेश बडगुजर, साक्षी गुजराथी, उज्जैनी पाटील, मृणाल वैद्य, प्रथमेश पाटील, चेतन शेटे, इतर सर्व धर्म सेवकांनी प्रयत्न केले.

## चौगांव येथे हभप इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील लासुर परिसरातील चौगांव येथे हभप निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम स्व.गुमानबाई पिरसिंग राजपुत स्मरणार्थ डॉ.विनोद राजपुत व संभाजी राजपुत तहसिलदार शहादा व महेंद्र राजपुत यांच्या सहभागातून भक्तीमय वातावरणात पार पडला.**



लासुर व चौगांव, चुंचाळे, हिगोणां, मामलदेसह परिसरातून महिला, युवक, पुरुषांनी हजारोच्या संख्येने उपस्थिती दिली.

याप्रसंगी ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आई-वडिलांची सेवा करा. आपल्या मुलांना लहान वयातच हरिपाठ शिकवा व व्यसनापासून दूर ठेवा, असे प्रबोधन केले. आजच्या कार्यक्रमात राजपुत परिवार विशेषतः परिसरातील सर्व ग्रामस्थ व महिलांनी पहिल्यांदाच हभप. इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाचा लाभ घेतला.

## ● निधन वार्ता

### धर्मेंद्र मगरे



**चोपडा ।** येथील महिला मंडळ शाळेतील सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष धर्मेंद्र देविदास मगरे (वय - ६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. धर्मेंद्र मगरे हे क्षत्रिय काचमाळी समाज मंडळ (महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात) यांचे माजी संचालक व श्री क्षत्रिय कांचमाळी समाज सुधारणा मंडळ चोपडाचे माजी सचिव होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ,पत्नी,दोन मुले,सून,नातवंडे असा परिवार आहे.

## श्री गुरुदेव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जागतिक महिला दिन साजरा

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील श्री गुरुदेव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहात पार पडला. मचला, सेकंड इनिंग आनंदाने जिंकूफया विषयावर समुपदेशक आरती चौधरी यांनी व्याख्यान दिले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयश्री ढाके होत्या. महादेव हरिमकर, सचिव बी.डी.चौधरी, माजी अध्यक्ष प्रकाश विसपुते तसेच रामकृष्ण पाटील, रमाकांत पाटील, प्रकाश तायडे, डी. एस. पाटील उपस्थित होते. यशस्वितेसाठी जयश्री आरती चौधरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आयुष्याची पहिली इनिंग शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि कुटुंबीय जबाबदाऱ्या पार पाडण्यात जातात. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे अनुभव हे समाज, कुटुंब व पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकतात, असेही स्पष्ट केले. संघाचे अध्यक्ष नारायण पाटील, शोभा जावळे, मंगला येवले, साधना मोहरील यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन लतिका क्षिरसागर यांनी केले. क्रिडा मंडळ भुसावळाचे किरण चौधरी, जयश्री ओक, लता होसकोटे, प्रिता पिंगळे यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाला उर्जा दिली.

## उपचारादरम्यान जखमी तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी । रावेर

खानापूर येथील हेमंत अशोक महाजन (वय ३१) याचा अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झाल्यानंतर तब्बल महिनाभरानंतर मृत्यू झाला. ९ फेब्रुवारी रोजी रात्री चोरवड ते खानापूरदरम्यान बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गालगतच्या एका पेट्रोलपंपाजवळ पायी जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली होती. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. उपचार सुरूअसताना १२ मार्च रोजी त्यांचा मृत्यू झाला.

## जंक फूडला नकार पौष्टिक आहाराचा स्वीकार!

### पंकज विद्यालयात विद्यार्थ्यांना आरोग्यदायी आहाराचे मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा

**आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी सवयी रुजाव्यात आणि जंक फूडचे दुष्परिणाम समजावेत, या उद्देशाने येथील पंकज विद्यालयात जंक फूड, पौष्टिक पर्याय, पोषक तत्वे व त्यांचे फायदे याबाबत विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**




या उपक्रमात विद्यार्थ्यांना जंक फूड म्हणजे काय, त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच त्याऐवजी कोणते पौष्टिक पर्याय निवडावेत, याची सविस्तर माहिती अनिल पाटील यांनी दिली. बर्गर, पिझ्झा, चिप्स यांसारख्या जंक फूडऐवजी फळे, भाज्या, दूध, कडधान्ये, सुकामेवा यांसारख्या पौष्टिक पदार्थांचे सेवन करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. विद्यालयात विविध पौष्टिक पदार्थ मांडणी करून मार्गदर्शन केले. तसेच अन्नातील विविध पोषक तत्वे जसे की प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे आणि कार्बोहायड्रेट यांचे शरीरासाठी असलेले फायदे सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यात आले. संतुलित आहार घेतल्याने शरीर निरोगी राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते अभ्यासातील एकाग्रता सुधारते, असे मार्गदर्शनही करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी जीवन शैलीबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमास जयश्री पाटील, तेजस सोनवणे यांचे सहकार्य लाभले.

## चुंचाळे गायरान प्रश्न निकाली; ११५ घरकुलांसाठी जागा मोजमापास सुरुवात

### आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे; माजी आमदार लताताई सोनवणे यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील चुंचाळे ग्रामपंचायत हद्दीतील गेल्या तीन ते साडेतीन दशकांपासून प्रलंबित असलेला गायरान जमिनीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. त्यामुळे ११५ आदिवासी कुटुंबांना घरकुलासाठी जागा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**







आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे आणि माजी आमदार लताताई सोनवणे यांच्या प्रयत्नांमुळे पंचायत समितीमार्फत संबंधित जागेचे मोजमाप सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. चुंचाळे गावातील गायरान जमिनीवर पावरा समाजातील अनेक आदिवासी कुटुंबे गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून वास्तव्यास आहेत.

मात्र जमीन मालकीचा प्रश्न निकाली न निघाल्याने या कुटुंबांना घरकुल योजनांचा लाभ मिळत नव्हता.

यासंदर्भात आदिवासी सेवक संजीव पांडुरंग शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली तितऱ्या बारेला, रेलसिंग बारेला, किर्ती बारेला यांच्यासह आदिवासी बांधवांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी माजी आमदार लताताई सोनवणे, आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे तसेच जिल्हा प्रशासन आणि पंचायत समितीकडे निवेदने सादर केली होती.

या मागणीची दखल घेत आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी जिल्हाधिकारी स्तरावर पाठपुरावा करून हा प्रश्न निकाली काढला. त्यानंतर पंचायत समितीमार्फत ११५ घरकुलांसाठी जागावाटप व मोजमाप प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटल्याने आदिवासी समाजात समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, गायरान प्रश्न मार्गी लागल्यामुळे गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची टाकी, महिला व पुरुषांसाठी शौचालये तसेच घरकुल योजना राबविण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. जमिनीच्या मोजमापावेळी सरपंच सपना कोळी, उपसरपंच सरला कोळी, ग्रामपंचायत सदस्यांसह अनेक ग्रामस्थ व आदिवासी बांधव उपस्थित होते.

### ➤ 'आदिवासींच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण'



आदिवासी बांधवांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून मी अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होतो. २८ ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निवेदन देऊन उपोषणही केले होते. आज आमदारांच्या प्रयत्नामुळे आदिवासी बांधवांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होत आहे. असे आदिवासी सेवक संजीव पांडुरंग शिरसाठ यांनी सांगितले.

### ➤ पंचायत समितीच्या पथकाकडून मोजमाप

गटविकास अधिकारी डॉ. मंजुश्री गायकवाड यांच्या आदेशान्वये पंचायत समितीचे दिनेश पाटील (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक), हर्षल चौधरी (ग्रामीण गृहनिर्माण अभियंता) व ग्रामसेवक निकेतन बिऱ्हाडे यांनी जागेचे मोजमाप केले. प्रधानमंत्री आवास योजना व शबरी योजना अंतर्गत ११५ आदिवासी कुटुंबांना घरकुलासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे.

## एचपीव्ही लसीकरणासाठी पालकांना आवाहन

प्रतिनिधी । नशिराबाद

महिलांमध्ये आढळणारा गर्भाशय मुखाचा कर्करोग हा गंभीर आजार असला तरी योग्यवेळी मएचपीव्हीफ लसीकरण केल्यास त्यापासून प्रभावी संरक्षण मिळू शकते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यभर एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून, जिल्हा आरोग्य विभाग जळगावच्या वतीने पालकांना आपल्या मुलींचे लसीकरण करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र नशिराबाद येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना ही लस देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही लस भविष्यात गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून आयुष्यभर संरक्षण देण्यास मदत करते.